**वाचले :-** १) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (सर्वसाधारण शाखा) यांचेकडिल आदेश क्र.पसर/कावि/१०१०/०५. दि.११/१०/२००५

२) जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (संजय गांधी योजना शाखा) यांचेकडिल पत्र क्र.संगांयो/कावि/प्रशा/९७/१६, दि.२२/२/२०१६

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
सर्वसाधारण शाखा(अभिलेख कक्ष)
क्र.पसर/कावि/३१९/१६
दि. २८/३/२०१६

विषय:- माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम ५ (१) अन्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना पदनिर्देशित करणेबाबत

## आदेश

ज्या अर्थी या कार्यालयाकडिल माहिती अधिकारी पदनिर्देशित करणेचा आदेश क्र.पसर/कावि/१०१०/०५, दि.११/१०/२००५ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिनस्त संजय गांधी योजना शाखेस तहसिलदार संजय गांधी योजना शाखा यांना जन माहिती अधिकारी म्हणून, अव्वल कारकून यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून व अपिलीय प्राधिकारी म्हणून रजा राखीव उपजिल्हाधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले होते.

कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजाचा जलद गतीने निपटारा होणेचे दृष्टीने तहसिलदार संजय गांधी योजना शाखा यांची अपिलीय प्राधिकारी तसेच कार्यालयातील अव्वल कारकून यांना जन माहिती अधिकारी व संबंधित लिपीक यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करुन माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(१) अन्वये प्राप्त प्रथम अपीले सत्वर निपटारा करण्यासाठी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे पदामध्ये खालील प्रमाणे बदल करणे आवश्यक वाटते.

त्या अर्थी मी जिल्हाधिकारी पुणे मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार व माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम ५(१) अन्वये संजय गांधी योजना शाखेकरिता खालील प्रमाणे अपिलीय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांची पदे निर्देशित करीत आहे.

| शाखेचे नांव | निर्देशित पद | पदाचे नांव |
|---|---|---|
| संजय गांधी योजना शाखा | सहाय्यक माहिती अधिकारी | संबंधित लिपिक |
| | शासकीय माहिती अधिकारी | अव्वल कारकून |
| | अपिलीय प्राधिकारी | तहसिलदार संजय गांधी योजना शाखा |

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरित करणेत यावी.

( सौरभ राव )
जिल्हाधिकारी पुणे

प्रति:-

१) रजा राखीव उपजिल्हाधिकारी, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

२) तहसिलदार, संजय गांधी योजना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

३) अव्वल कारकून, संजय गांधी योजना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रत:- राष्ट्रीय सूचना अधिकारी, पुणे (NIC)

सदर आदेश जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे वेबसाईटवर प्रसिध्द करुन अहवाल पाठवावा.

जिल्हाधिकारी पुणे करिता